ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## SPECIAL ISSUE : V
## FEBRUARY - 2021

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | साहित्यिक गो. नी. दांडेकर यांचा जीवनप्रवास | सुप्रिया राजाराम गांवकर | 122-126 |
| 27 | मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती : जागतिकीकरणाच्या संदर्भात | प्रा.शरदकुमार भागाजी माळीराव | 127-131 |
| 28 | अमृता प्रीतम के 'पिंजर' उपन्यास में नारी चित्रण | अर्चना कडूबा पालवार | 132-134 |
| 29 | अधूरे देह की त्रासदी: किन्नर कथा | प्रा.डॉ.बाबासाहेब भुगाडे | 135-140 |
| 30 | संत तुलसीदास की प्रासंगिकता | डॉ. विष्णु गव्हाणे | 141-144 |
| 31 | ''महादेवी वर्मा और छायावाद'' | प्रा.खाडे विद्या बाबूराव | 145-147 |
| 32 | अलका सरावगी के कहानी संग्रह : दूसरी कहानी में वर्णित नारी | प्रीती अहिर | 148-152 |
| 33 | हरिवंशराय बच्चन के काव्य में प्रतीकात्मकता | डॉ.सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड | 153-156 |
| 34 | संत तुकाराम का विद्रोह | डॉ. टाळके ए. बी. | 157-162 |
| 35 | सामाजिक कार्यकर्ता और समाज में अच्छा परिवर्तन करन में उसकी भूमिका | शिंदे प्रशांत हाबु | 163-167 |
| 36 | वृद्धावस्था : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. दिलीप कुमार सोनी | 168-174 |
| 37 | शितयुध्द कालखंड मे संयुक्त राष्ट्रसंघ की सफलता,असंफलता एक परिक्षण | डॉ.सूर्यकांत माधवराव सांभाळकर | 175-180 |
| 38 | संत रविदास यांचे स्त्रीमुक्ती विषयी विचार | प्रा.चव्हाण आर.ए. | 181-183 |
| 39 | महात्मा बसवण्णाच्या समतेच्या लढयातील पहिले बलिदान : वीरशरण हरळय्या | प्रा.डॉ.दत्ता पिलाप्पा हिंगमिरे | 184-187 |
| 40 | मराठेकालीन जमीन महसूल पध्दती एक अभ्यास | डॉ.देवकाते बी.एन. | 188-194 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेचे किंवा शासनव्यवस्थेचे मूल्यमापन | प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर | 195-200 |
| 42 | सेनापती उमाबाई दाभाडे जीवन आणि कार्य | डॉ.सावंत के.डी. | 201-204 |
| 43 | कालखंडानुसार मोहोळ तालुक्याच्या इतिहासाचा | डॉ. सज्जन उध्दव पवार | 205-208 |
| 44 | आदिवासी कोकणीसमाजातील समाजसुधारक : श्री. बी. एस.कोकणी | डॉ. शशीकांत गोकुळ साबळे | 209-212 |
| 45 | ''लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे लोकोध्दारक कार्य'' | प्रा.डॉ.सुनिल रजपूत | 213-215 |
| 46 | प्रशासक हा तत्त्वज्ञ का असायला पाहिजे? (Why the Administrator Should be Philosopher) | चंद्रकांत प्रल्हाद सोनवणे | 216-220 |
| 47 | कृषी क्षेत्रातील राजर्षी शाहू महाराज यांचे | प्रा.डॉ.व्यंकटेश काळूराम मदनुरे | 221-223 |
| 48 | शिवकालीन ग्रामीण अर्थकारण | डॉ.मुळे नंदकिशोर कृष्णराव | 224-227 |
| 49 | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान : शेतकरी आत्महत्या | गजानन संभाजी फुपाटे | 228-233 |
| 50 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे आर्थिक विचार | प्रा.सुनिल मिरासे | 234-237 |
| 51 | कोरोना कालखंड आणि भारतीय महिलांची स्थिती | डॉ.प्रा.चांगदेव निवृत्ती मुंढे | 238-241 |
| 52 | शिवकालीन अष्टप्रधान मंडळ व प्रशासन व्यवस्था | डॉ.ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे | 242-245 |
| 53 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कृषिविषयक दृष्टिकोन एक भौगोलिक अभ्यास | प्रा.कांबळे दयानंद सखाराम | 246-249 |


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

# "लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे लोकोध्दारक कार्य"

प्रा.डॉ.सुनिल रजपूत
जवाहर महाविद्यालय,अणदूर

**प्रस्तावना :-** महाराष्ट्रातील थोर समाजसुधारकांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे स्थान हे मोलाचे आहे.त्यांच्या कार्यकाळात त्यांनी दिन-दलित आणि मागासवर्गीय समाजासाठी फार मोलाचे आणि भरीव कार्य केले आहे. त्यांचे महाराष्ट्राच्या आणि कोल्हापूर संस्थानाच्या इतिहासातील स्थान हे अनन्य साधारण आहे.

सामाजिक विषमतेच्या दाहक स्वानुभवातून चिंतनशील व प्रगल्भ बनलेले व्यक्तिमत्व व विषमतेच्या विरोधात प्रतिष्ठा पणाला लावणारे नेतृत्व म्हणजेच लोकराजा राजर्षी शाहू महाराज होय. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचे विविध आयाम आहेत.त्यांनी राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाहीला अधिक महत्व दिले. सामाजिक क्षेत्रातील प्रयोगशीलतेबरोबरच राजर्षी शाहू महाराजांनी, शिक्षण, उद्योग, सहकार, रोजगार, कामगार, शेती, पाणी, आरोग्य इत्यादी मानवविकासासंबंधी विचारांना महत्व दिले होते. म्हणून छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि सामाजिक समता हे समीकरण फार महत्वाचे आहे. राजर्षी शाहू महाराज आयुष्यभर सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आणि अस्पृश्य बहुजन समाजाचा उध्दार करण्यासाठी प्राणपणाने लढले. ते एक कृतिशील आणि प्रयोगशील राजे, समाजसुधारक व विचारवंत होते.

**विषयाची निवड: -**

लोकराजा राजर्षी शाहू महाराजांनी संस्थान व संस्थानाबाहेरील लोकांचा विचार करून त्यांच्या कल्याणासाठी केलेल्या अभूतपूर्व कार्याची माहिती व्हावी या दृष्टीकोनातून "लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे लोकोध्दारक कार्य" या विषयाची निवड केली आहे.

**विषयाचा उद्देश :-**

१) राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा विविध आयामातून अभ्यास करणे.
२) राजर्षी शाहू महाराजांच्या विविध लोकोपयोगी धोरणांचा आढावा घेणे.
३) राजर्षी शाहू महाराजांचे अभूतपूर्व कार्य अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत विषयासाठी संदर्भ संशोधन साधनांचा उपयोग केला आहे.त्यात प्राथमिक व दुय्यम संदर्भ ग्रंथाचा वापर केला आहे.

**शिक्षण विषयक धोरण :-** राजर्षी शाहू महाराजांच्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. शिक्षणाशिवाय सुधारणा होणार नाहीत, म्हणून त्यांनी शिक्षणाला महत्व देऊन इ.स.१९०७ मध्ये "मिस क्लार्क बोर्डींग" नावाचे वसतिगृह उघडले. शिक्षणाचा प्रचार-प्रसार व्हावा म्हणून इ.स.१९१६-१९१७ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून शाळा, महाविद्यालय, बोर्डींग तसेच शिष्यवृत्या सुरू केल्या. तसे आदेशच त्यांनी संस्थानात जारी केले. समाज समृध्द व बलवान करण्यासाठी बहुजन समाजातून उत्तम शेतकरी, उत्तम शिक्षक, उत्तम व्यापारी, उत्तम उद्योगपती, सैनिक निर्माण झाले पाहिजेत. आणि त्यासाठी शिक्षणगंगेचे पाट खेडयापाडयात गोर-गरीब जनतेच्या दारापर्यंत नेले पाहिजेत. असे शाहू महाराजांना वाटत होते.

**राजर्षी शाहू महाराजांची वसतीगृह काढण्यामागची कल्पना :-** मागसलेल्या व ब्राम्हणेत्तर समाजाने शिक्षण घेतले पाहिजे, यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये वसतीगृहे काढली. ही वसतीगृहे काढत



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

असताना ती जाणुनबुजून जातीनिहाय काढली. जातीनुसार वसतीगृह काढणे हे एक प्रकारचे आरक्षणाचेच धोरण होते, कारण विशिष्ट जातीच्या लोकांसाठी विशेष वसतीगृह काढल्यामुळे त्या जातीतील मुले ही एकाच जागी एकोप्याने राहतील ही त्यांची भावना होती.

**आरक्षणातून प्रगती :-** चातुर्वर्णव्यवस्था प्रचंड मोठया प्रमाणावर बोकाळलेली असल्यामुळे आणि प्रत्येकाला जातीनुसार काम वाटून दिले असल्यामुळे अस्पृश्य समाजात प्रगती होत नव्हती, शिक्षण नव्हते. खालच्या वर्गातील माणूस वरच्या वर्गात जाऊ शकत नव्हता. अस्पृश्यांची प्रगती व्हावी, त्यांचे दारिद्रय दूर होऊन त्यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्यांचे जीवनमान उंचवावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी नोक-यांमध्ये ५०% जागा राखुन ठेवण्याची क्रांतीकारी घोषणा करून २६ जुलै १९०२ मध्ये आदेश काढून क्रांतीकारी पाऊल उचलले होते.

**अस्पृश्योध्दाराचे कार्य :-** वेदोक्त प्रकरणावरून राजर्षी शाहू महाराजांना जातीयतेचा अनुभव आला. राजासारख्या व्यक्तिबरोबर हे असे वागत असतील, तर सामान्य माणसांचे काय खरे आहे? म्हणून त्यांनी जातीव्यवस्थेविरूध्द संघर्ष करण्याचे ठरविले. त्यांचे हे कार्य संस्थाना पुरते मर्यादीत नसून ते संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले होते. त्याकाळात अस्पृश्य समाजाचे फार हाल झाले होते, माणूस म्हणून कोणी त्यांच्याकडे पाहत नव्हते. विषमतेमुळे त्यांचे जीवन पोखरून निघाले होते. म्हणून त्यांनी अस्पृश्य जातीच्या लोकांना उपहारगृहे, दुकाने चालविण्यासाठी आर्थिक मदत केली. अस्पृश्य समाजातील व इतर गरीब समाजातील लोकांना सरकारी नोक-या दिल्या. वकिलीच्या सनदा दिल्या. जातीयता कमी करण्याचा प्रयत्न करून त्यांना मानसन्मानाचे जीवन दिले.

**राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर :-** छत्रपती शाहू महाराजांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचविषयी खूप आदर आणि अभिमान होता. म्हणून ते स्वत: डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भेटण्यासाठी मुंबई येथे त्यांच्या घरी गेले, त्यांचा सत्कार केला. त्यांना वृत्तपत्र काढण्यासाठी व इतर शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करून माणगाव परिषदेत अस्पृश्य व इतर बांधवांना त्यांचा परिचय करून दिला आणि सांगितले की, माझ्या नंतर अस्पृश्योध्दारक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच असतील. अशा मोठया मनाचे ते राजे होते.

**आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार :-** स्त्रियांच्या प्रगतीसाठी आणि जातीयता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी कार्य केले. इ.स. १९१८ मध्ये त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. स्वत:च्या घरात धनगर घराण्याशी नाते जुळवुन ते कृतीत उतरवून आणले. जातीयता कमी व्हावी म्ळणून त्यांनी स्वत: काही विवाह घडवून आणले. विधवा विवाहास मान्यत देऊन इ.स.१९२० मध्ये घटस्फोटाचा कायदा केला.

**शेती, उद्योगधंदे आणि सहकार :-** शेतीचा उध्दार म्हणजे शेतक-यांचा उध्दार, पर्यायाने देशाचा उध्दार हे सूत्र ध्यानात घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शेतीसाठी मूलभूत सुधारणा केल्या. त्याला जोड म्हणून नवनवीन उद्योगधंदे सुरू केले. आणि या उद्योगधंद्यांना सहकार तत्वाची ऊर्जा दिली. म्हणूनच आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योगधंदे व सहकार या तिन्ही क्षेत्रात आघाडीवर दिसतो. याचा पाया अनेक वर्षापूर्वी शाहू महारजांनी घातला होता, हे विसरता येणार नाही.

**इ.स. १८९६ ते १८९९ या काळात संस्थानात पडलेल्या भयंकर दुष्काळात शाहू महाराजांनी** अन्नधान्य व गवतचा-याचा वेळीच पुरवठा केल्यामुळे हजारो लोकांचे व जनावरांचे प्राण वाचले होते. परंतू वारंवार पडणा-या दुष्काळासारख्या संकटावर कायमची मात करण्याची पायाभूत स्वरूपाची योजना तयार करावी असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी इ.स.१९०२ मध्ये आपल्या, संस्थानासाठी अपूर्व असे 'सार्वत्रीक पाटबंधारे धोरण' जाहीर केले. व स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून या खात्यामार्फत संस्थानातील प्रत्येक गावाची, पाटबंधा-याच्या दृष्टीने तपशीलवर पाहणी करण्यात आली. आणि पावसाच्या पाण्याचा प्रत्येक स्त्रोत अडविणाचा प्रयत्न सुरू झाला.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

यातूनच जलप्रदान आणि सिंचन या धरणाची महत्त्वाकांक्षी योजना पुढे आली. आणि कोल्हापूर संस्थानात हरित क्रांतीचा प्रारंभ झाला.

इ.स.१९०७ साली कोल्हापूरच्या पश्चिमेस ५५ कि.मी. अंतरावर राधानगरी जवळ भोगावती नदीवर धरण बांधून त्याच्या जलाशयास 'महाराणी लक्ष्मीबाई ' असे नाव देण्यात आले. या धरणाजवळच्या गावास शाहू महाराजांच्या राधाबाई या मुलीच्या नावावर 'राधा नगरी' हे नाव देण्यात आले.

इ.स.१९१२ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये सहकारी कायदा पारीत केला होता. आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने शेतीचा विकास घडवून आणत असताना, आपल्या लोकांनी केवळ शेतीवरच अवलंबून न राहता व्यापार उद्योगाच्या क्षेत्रात प्रवेश केला पाहिजे, कारण आधुनिक काळात राष्ट्राची उन्नती ही व्यापार- उद्योगावर अवलंबून असल्याचे मत शाहू महाराजांनी अनेक सभा परिषदांमधून व्यक्त केलेले आहे.

एक राज्यकर्ता असतानाही व्यापाराला महत्त्व देणे व स्वतःही आपल्या मुलांनाही व्यापारात आणावे याकरिता प्रयत्न करणारे राजर्षी शाहू महाराजांच्या मनाचा व कर्तृत्वाचा मोठेपणा दिसून येतो.

निष्कर्ष : -

१) सामाजिक विषमतेच्या दाहक स्वानुभवातून चिंतनशील व प्रगल्भ बनलेले व्यक्तिमत्त्व म्हणजेच लोकराजा राजर्षी शाहू महाराज होय.

२) राजर्षी शाहू महाराज आणि सामाजिक समता हे समीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे.

३) राजर्षी शाहू महाराज कृतिशील आणि प्रयोगशील राजे, समाजसुधारक व विचारवंत होते.

४) राजर्षी शाहू महाराजांनी राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाहीला अधिक महत्त्व दिले होते.

५) राजर्षी शाहू महाराजांनी केवळ शेतीवरच अवलंबून न राहता व्यापार उद्योगाच्या क्षेत्रात प्रवेश करून राष्ट्राची उन्नती केली पाहिजे असे मत व्यक्त केले होते.

अशा प्रकारे लोकराजा राजर्षी शाहू महाराज हे सामान्य माणसात मिसळणारे , सामान्यांसाठी झटणारे राजा होते. सामाजिक समरसतेच्या निर्मितीसाठी त्यांनी आतोनात कष्ट घेतले. सर्वांना न्याय मिळावा, हक्क मिळावेत, अस्पृश्यांना समानतेची व माणूसकीची वागणूक मिळावी, त्यांच्या अंगी वैज्ञानिकता यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. यावरूनच राजर्षी शाहू महाराजांचे मोठेपण लक्षात येते.

संदर्भ सूची :-


१) डॉ.जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर -१ आवृ २०१२ , पृ.८९

२) कित्ता पृ.क्र.९५,९६

३) कित्ता पृ.क्र.१४१,१४२,१४३

४) दैनिक सकाळ, मराठवाडा आवृत्ती, दि.२६ जून २०२०

५) भोसले एस.एस. (संपा), क्रांतीसूक्ते : राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. पृ.क्र.२

६) कित्ता पृ.क्र.१२१.


◆◆◆



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad